# भुयारातून मेट्रो धावतेय सुसाट...




भुयारीकरण
१०० टक्के
झाले आहे.




प्रकल्पाचे
एकूण ७६.६
टक्के काम पूर्ण
झाले आहे.

**पहिला टप्पा** डिसेंबर २०२३ मध्ये सुरु होणार
**दुसरा टप्पा** डिसेंबर २०२४ मध्ये सुरु होणार



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ मार्गाचे काम सुरु असून आता चाचण्या सुरु आहेत. सुमारे १० हजार किलोमीटरच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत.

**मेट्रो ३**

**मार्ग : कुलाबा - वांद्रे - सीप्झ**
**पहिला टप्पा : सीप्झ - बीकेसी**
**दुसरा टप्पा : बीकेसी - कुलाबा**

- मेट्रो ३ च्या पूर्णत्वानंतर १७ लाख प्रवासी प्रवास करु शकणार.
- मेट्रो मार्ग ३ ची एकूण लांबी ३३.५ किमी
- मार्गात २६ भुयारी आणि एक जमिनीवरील अशी २७ स्थानके

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अंधाऱ्या मार्गातून प्रखर दिव्यांच्या उजेडात मुंबईच्या भुयारी मेट्रोच्या चाचणीचा वेग आणखी सुसाट झाला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो मार्ग ३ चे काम सुरू असून, आता भुयारी मेट्रोच्या चाचण्या सुरू आहेत. कॉर्पोरेशनच्या म्हणण्यानुसार सुमारे दहा हजार किलोमीटरच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. दहा हजार किलोमीटरच्या अंतराच्या चाचणीदरम्यान स्पीड, ऑस्सिलेशन, इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स अशा चाचण्यांचा समावेश आहे.

दक्षिण मुंबईतील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाची मेट्रो मार्गिका कुलाबा ते सीप्झ साठीच्या मेट्रो रेल्वेची डब्यांची मरोळ मरोशी येथे चाचणी केली जात आहे. मुंबई येथील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी व प्रदूषण कमी करण्यासाठी कुलाबा ते सीप्झ या मार्गावर मेट्रो लाईन - ३ चे काम प्रगतिपथावर आहे. या मार्गिकेकरिता अल्स्टॉम या कंपनीकडून श्रीसिटी आंध्रप्रदेश येथे ट्रेन तयार केल्या जात आहेत. या गाडीची त्या ठिकाणी तांत्रिक चाचणी झालेली आहे. आता प्रत्यक्षात याची चाचणी मुंबई येथे घेण्यात येत आहे.